# राष्ट्रीय सेवा योजना (NSS)

## अहवाल २०२०-२०२१

सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाने ४९ व्या वर्षामध्ये पदार्पण केले. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व उपक्रम नियमित आणि उत्कृष्टपणे राबविण्यासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयामध्ये प्र.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजना समितीची स्थापना करण्यात आली. कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रथम वर्षामधील १०० स्वयंसेवकांची नाव नोंदणी नोव्हेंबर २०२० मध्ये करण्यात आली. जून २०२० पासून वर्षभरामध्ये कोविड-१९ महामारीच्या बाबतचे सर्व शासकीय नियमांचे पालन करून महाविद्यालयात खालील उपक्रम राबविण्यात आले.

**१. आंतरराष्ट्रीय योग दिन:**

शिवाजी विद्यापीठाच्या १६/०६/२०२० च्या ई-मेलद्वारे पाठवलेल्या पत्रानुसार दिनांक २१ जून २०२० रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, सर्व प्राध्यापक, सर्व प्रशासकीय कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी "Yoga at Home and Yoga with Family" यावर आधारित आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला. सर्वांनीच घरीच राहून योग दिन साजरा केला. त्यामध्ये १८२ पेक्ष्या अधिक स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**२. राज्यस्तरीय प्रेरणा नेतृत्व गुण विकास शिबीर:**

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि युनिसेफ यांनी दिनांक ११ जुलै ते १५ जुलै २०२० याकालावधीत राज्यस्तरीय प्रेरणा नेतृत्व गुण विकास शिबिर आयोजित केले होते. सदरचे शिबीर ऑनलाईन पध्दतीने संपन्न झाले. त्यामध्ये महाविद्यालयातील दोन कार्यक्रम अधिकारी आणि २५ पेक्ष्याही जास्त स्वयंसेवक (YouTube Link) युटूबलिंकद्वारे सहभागी झाले होते.

**३. वृक्ष लागवड:**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वनसप्ताह निमित्त दिनांक ०७ जुलै २०२० रोजी महाविद्यालयाच्या शिवनेरी क्रीडागंणावर ३० इतक्या वृक्षांची लागवड मा.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर यांच्या शुभहस्ते केली. वृक्ष लागवडीसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्वयंसेवकांनी वनसप्ताह निमित्त प्रतिस्वयंसेवक किमान एक वृक्षाची लागवड आपल्या घराभोवतालच्या परिसरात किंवा शेतातील बांधावर करावी असे अहवान राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत करण्यात आले. या अहवानाला साथ देवून राष्ट्रीय सेवा योजनेच्या २०० स्वयंसेवकांनी २२१ इतक्या वृक्षांची लागवड केली. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर राष्ट्रीय सेवा योजना आणि सकाळ मिडिया ग्रुप (युवा इन्स्पायर्स नेटवर्क-यिन) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वन्य दिनानिमित्त दिनांक २१ मार्च २०२१ रोजी वृक्षारोपण कार्यक्रम शिवनेरी क्रीडागंणावर साजरा

केला गेला. जागतिक वन्य दिनानिमित्त मा.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर यांच्या शुभहस्ते २५ इतक्या वृक्षाची लागवड करण्यात आली. स्वयंसेवकांच्या तर्फे एकूण २७६ इतक्या वृक्षांची लागवड सन २०२०-२०२१ या वर्षात केली गेली.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्यावतीने माझी वसुंधरा मित्र अभियान राबविले, त्यामध्ये सर्व स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांनी भाग घेतला.

**४. कोविड-१९ काळातील ग्राहकवाद आणि वित्तीय साक्षरता वेबिनार:**

कन्झुमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई आणि यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, अर्थशास्त्र, इतिहास आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २९ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी ११:०० ते ०१:३० आणि दुपारी ०२:०० ते ०४:१० यावेळेत एकूण दोन वेबिनार घेण्यात आले. त्यामध्ये २७७ पेक्ष्याही जास्त विद्यार्थी/ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. प्रथम वेबिनारचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. सी. आर. जाधव समन्वयक, रा.स.यो. यांनी केले, तर उद्घाटन माननीय.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर यांच्या शुभहस्ते केले गेले. पहिल्या वेबिनारचे प्रथम वक्ते माननीय श्री. दिनेश भंडारे यांनी ग्राहकवाद याविषयावर मार्गदर्शन केले, तर दुस-या वक्त्या श्रीमती अर्चना भिंगार्डे यांनी वित्तीय साक्षरता याविषयावर मार्गदर्शन केले. प्रथम वेबिनारचे आभार प्रा.उमेश जांभोरे इतिहास विभाग प्रमुख यांनी मानले. तसेच दुसरे वेबिनार दुपारी ०२:०० ते ०४:१० यावेळेत संपन्न झाले. दुस-या वेबिनारचे स्वागत प्रास्ताविक प्रा.डॉ.डी.आर.धेडे अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले, तर उद्घाटन मा.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर यांच्या शुभहस्ते केले. दुस-या वेबिनारचे प्रथम वक्ते माननीय श्री. राजेश कोठारी यांनी ग्राहकवाद याविषयावर मार्गदर्शन केले, तर दुस-या वक्त्या श्रीमती स्नेहा आपटे यांनी वित्तीय साक्षरता याविषयावर मार्गदर्शन केले. दुस-या वेबिनारचे आभार प्रा.डॉ. रंगराव कावणे समन्वयक,रा.स.यो.यांनी मांनले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सी. आर. जाधव यांनी केले. वेबिनार संपन्न करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष माननीय आमदार डॉ. विनयरावजी कोरे साहेब यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाली. संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी माननीय प्रो.डॉ. वासंती रसम मॅडम यांनी प्रोत्साहन आणि मार्गदर्शन केले. तसेच मा.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकरसर यांच्या मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि प्रेरणेमुळेच वेबिनार उत्कृष्ट पध्दतीने संपन्न करता आले. वेबिनार संपन्न करण्यासाठी महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना समिती, प्रशासकीय कर्मचारी, चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. बाळासाहेब लाडगांवकर, रा.स.यो.चे क्लर्क श्री. प्रदिप काळे यांचे विशेष सहकार्य लाभले. सर्व तांत्रिक सहकार्य कन्झुमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई यांच्या कर्मचा-यांनी केले.

**५. स्वच्छ महाविद्यालय अभियान:**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमार्फत दरवर्षी स्वच्छ महाविद्यालय अभियान राबविले जाते. यावर्षात कोविड-१९ प्रादुर्भाव असल्यामुळे मार्च/एप्रिल-२०२० विद्यापीठ परीक्षा आक्टोंबर/नोव्हेंबर-२०२० मध्ये घेण्यात आल्या, त्यामुळे परीक्षेच्या काळात सर्व परीक्षार्थी आणि कर्मचारी यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी महाविद्यालय आरोग्य दक्षता समितीची स्थापन केली. सादर समिती मार्फत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी परीक्षा सुरु होण्यापूर्वी आणि परीक्षा झाल्या नंतर वर्ग खोल्या आणि सर्व बाक (बॅन्च) व्हरांडे निर्जंतुकीकारण करून घेतले. त्यामुळे कोणताही परीक्षार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी आजारी पडला

नाही. परीक्षा निरोगी वातावरणात उत्कृष्ठरित्या पारपडल्या. आरोग्य दक्षता समितीचे अध्यक्ष मा.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर तर नोडल अधिकारी प्रा.डॉ.रंगराव कावणे समन्वयक,रा.स.यो हे होते. समितीत एकूण ११ सदस्य होते. त्यामध्ये डॉ.सी.आर.जाधव, श्री.बी.जे.लाडगांवकर, डॉ.बी.एस.शिर्के, डॉ.डी.आर.धेडे, डॉ.बी.के.वानोळे, डॉ.आर.बी पाटील, श्री.आदिनाथ नलवडे, श्री.एस.एस.नागांवकर, श्री.हनमंत माने यांनी काम पाहिले. दि.१६/०३/२०२१ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १२.३० यावेळेत स्वयंसेवकांनी महाश्रमदानातून महाविद्यालय परिसर आणि वर्ग खोल्यांची स्वच्छता केली. तसेच वनस्पती उद्यानात हि स्वच्छता केली. या उपक्रमात एकूण १९५ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. स्वच्छता कार्यक्रमात सर्वांनी जवळपास २९३ श्रमतास इतके आपले श्रम योगदान दिले गेले. दि.२० मार्च २०२१ रोजी ठिक ११.०० ते ०१.०० या वेळेत महाविद्यालयाच्या शिवनेरी क्रीडांगणावरील झाडामधील गवत काढण्याचे कामकाज केले गेले. तसेच वन्यदिन प्रसंगी झाडे लावण्यासाठी खड्डे खणण्यात आले, या उपक्रमामध्ये ९८ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला आणि १९६ इतक्या श्रमतासाचे योगदान दिले.

**६. दक्षता जनजागृती सप्ताह:**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दक्षता जनजागृती सप्ताह महाविद्यालयात साजरा केला. महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ, वरिष्ठ व एच.एस.व्ही.सी. विभागाकडील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना दिनांक २७/१०/२०२० रोजी ठीक ११:०० वाजता मा.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर यांच्याकडून सर्वांनां भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ दिली गेली. माननीय प्राचार्यांनी गतिमान प्रशासनासाठी सर्वांना बहुमोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. एस. एस. खोत यांनी तर आभार प्रा.डॉ. रंगराव कावणे यांनी मानले. तसेच सर्वच स्वयंसेवकांनी ऑनलाईन माध्यमाच्या सहायाने केंद्रीय दक्षता आयोगाच्या वेब पोर्टलवरील चांगुलपणा आणि प्रामाणिकपाणाची सर्वांनी शपथ घेतली.

**७. संविधान दिन:**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने संविधान दिन दिनांक.२६/११/२०२० रोजी साजरा केला गेला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ.सी. आर.जाधव यांनी केले, तर मा.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर यांनी प्रथम भारतीय संविधान उद्देशिकेच्या प्रतिमेचे पूजन केले आणि त्यानंतर भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन केले. संविधान दिनाचे महत्व आणि संविधान याविषयावर माननीय प्राचार्य प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर यांनी महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना समिती, प्रशासकीय कर्मचारी, चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि काही स्वयंसेवक यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. आर.पी कवणे यांनी मानले.

**८. कोविड-१९ महामारीतील कामकाज:**

राष्ट्रीय सेवा योजने कडील स्वयंसेवकांनी "मीच माझा रक्षक", "माझे कुठूंब माझी जबाबदारी" या महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाप्रमाणे सर्वच स्वयंसेवकांनी कार्य केले, त्यामुळे या महामारीत कोणताही स्वयंसेवक कोविड-१९ रोगाला बळी पडला नाही. २७ मार्च २०२० ते १८ जुलै २०२० याकालावधीत कोविड-१९ साथ नियंत्रणासाठी पोलीस यंत्रणेला श्री. ओंकार पवार रा. कणेगाव या स्वयंसेवकाने मदत आणि सहकार्य केले. आपल्या गावात आणि घराच्या परिसरात परगावाहू येणा-या आणि बाधित लोकांच्या संपर्कात आलेल्या

लोकांचे अलगीकरण कसे करावे? कोविड प्रतिबंधात्मक उपाय काय करावेत? याबाबत स्वयंसेवकांनी अश्या लोकांना मदत आणि मार्गदर्शन केले. सर्वच स्वयंसेवकांनी कोविड-१९ प्रतिबंधित लस सर्व लोकांनी घ्यावी यासाठी आपल्या घरातील आणि गावातील लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सोसिअल मिडिया (Social Media) च्या माद्यमातून कोविड-१९ महामारी प्रतिबंधात्मक उपाय योजना आणि घ्यावयाची दक्षता याबाबत जनजागृती आणि जाणीवजागृती केली.

काही प्रातिनिधिक स्वयंसेवकांनी १५ ऑगस्ट २०२० व २६ जानेवारी २०२१ तसेच १३ डिसेंबर २०२० रोजी स्वर्गीय सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे यांच्या पुण्यतिथीला उपस्थित राहून राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रप्रेम व सामाजिक बांधिलकी दाखवून दिली. राष्ट्रीय सेवा योजनेचे नियमित कार्यक्रम व कोविड-१९ च्या महामारीत जनजागृती करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष माननीय आमदार डॉ. विनयरावजी कोरे साहेब यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा आम्हाला मिळाली. तसेच मा.प्राचार्य, प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर व संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी प्रा.डॉ.सौ.वासंती रासम यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. सर्व उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.पी.एस.आहुजा, डॉ.पी.आर. साळोखे, प्रा.उमेश जांभोरे यांचे लाखमोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि सर्व स्वयंसेवक यांचेही वर्षभर सहकार्य मिळाले. कोविड-१९ च्या महामारीत सर्वजणांनी स्वतः सुरक्षित राहून सामाजिक बांधिलकी जपली.

**प्रा.डॉ.आर.पी.कावणे**
**कार्यक्रम अधिकारी**

**प्रा.डॉ.सी.आर.जाधव**
**कार्यक्रम अधिकारी**